## वार्ता टिपण दिनांक १७/०६/२०१९

**वैधानिक इशारा विहीत नमुन्यात न छापलेल्या वेगवेगळया कंपनीच्या सिगारेटचा साठा करणा-यां वर खंडणी विरोधी पथकाकडून कारवाई.**

दिनांक १७/०६/२०१९ रोजी खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोहिते हे त्यांचेकडील अधिकारी व कर्मचा-यांसह बेकायदेशिर अंमली पदार्थ विक्री कारणारे व शासन विहीत वैधानिक इशारा न छापलेले वेगवेगळया कंपनीचे सिगारेट विक्रेते/साठा करणा-यांच्या संबंधाने माहिती काढण्यासाठी पेट्रोलिंग करीत असताना, ते लष्कर भागातील गिता सोसायटी जवळ आले असता, पोलीस कर्मचारी फिरोज बागवान व रमेश गरुड यांना त्यांच्या विश्वासू बातमीदाराकडून बातमी मिळाली की, लाल देऊळ हौसिंग सोसासटी लष्कर येथील फ्लॅट नं.सी/१७ चे एका रुममध्ये इसम नामे उमर फारुक शेख याने वैधानिक इशारा विहीत नमुन्यात न छापलेल्या वेगवेगळया कंपन्यांच्या सिगारेटची पाकीटांचा साठा केला आहे. अशी बातमी मिळाल्याने पो.नि.श्री राजेंद्र मोहिते यांनी त्यांच्या पथकाने वर नमूद ठिकाणी दोन पंचांचे उपस्थितीत छापा टाकला. तेथे इसम नामे उमर फारुक शेख वय-४० वर्ष रा.सी/१७, लाल देऊळ हौसिंग सोसायटी, लाल देवळाजवळ लष्कर पुणे व इसम नामे महंमदअफजल युसुफ वय-२० वर्ष रा.सदर हे किं.रु.९,१९,५००/- च्या पाईन कंपनी सिगारेट पाकीटे, क्लिओ पात्रा किंग साईज, गुडंगगरम, वीन, इसे, मारलोबोरो इत्यादी वेगळयावेगळया कंपनीची देशी विदेशी बनावटीचे सिगारेटची पाकीटे मिळून आली. सदरचा फ्लॅट हा इसम नामे फिदायतुल्ला खशमुदउल्ला खान वय-४० रा.सदर यांच्या मालकीचा असून त्यांनी सदरची रुम ही वर नमूद उम्र फारुक शेख यास भाडयाने दिलेली आहे. तेथे वैधानिक इशारा न छापलेले सिगारेटच्या पाकीटांचा साठा होत असल्याबाबत त्यांना माहिती असूनही त्यांनी दुर्लक्ष केले आहे. म्हणून वर नमूद तीन इसमांविरुध्द लष्कर पोलीस स्टेशन येथे खटला रजि.नं.१३८/२०१९ कोटपा कायदा क.७(२),२०(२) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

**सदरची कामगिरी ही गुन्हे शाखेचे अप्पर पोलीस आयुक्त मा.श्री.अशोक मोराळे सो., पोलीस उप आयुक्त श्री.शिरीष सरदेशपांडे सो.,सहा.पोलीस आयुक्त श्री.समीर शेख सो.यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस उप निरी.आनंद रावडे, निखिल पवार, पोलीस कर्मचारी अविनाश मराठे, रमेश गरुड, फिरोज बागवान, शिवानंद बोले यांनी केली आहे.**